25 OCT 2026

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विद्यार्थ्यांनी समाजोपयोगी नवकल्पना साकाराव्यात

प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव; आविष्कार स्पर्धेत पर्यावरणशास्त्र विभागाला जनरल चॅम्पियनशिप

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

विद्यार्थ्यांनी संशोधनाच्या माध्यमातून समाजोपयोगी नवकल्पना साकाराव्यात आणि कल्पनांना प्रत्यक्ष कृतीची जोड द्यावी, असे आवाहन प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात आयोजित विद्यापीठस्तरीय आविष्कार स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभात त्या बोलत होत्या. स्पर्धेत विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाने जनरल चॅम्पियनशिप पटकावली. स्पर्धेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांच्या हस्ते झाले. जैवतंत्रज्ञान, जैवरसायन, पर्यावरणशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र तसेच कृषी रसायने व



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित आविष्कार स्पर्धेतील विजेत्या संघासमवेत प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव. सोबत डॉ. एस. एम. गायकवाड, डॉ. आर. व्ही. गुरव आदी. (छाया : नाज ट्रेनर)

कीड व्यवस्थापन विभागांच्या संयुक्त विद्यमाने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

स्पर्धेत मानवविद्या, भाषा व ललितकला, कला-वाणिज्य-व्यवस्थापन व विधी, शुद्ध विज्ञान, कृषी व पशुसंवर्धन, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान तसेच वैद्यक व औषधनिर्माणशास्त्र या सहा विभागांत विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. पदव्युत्तर स्तरावरील स्पर्धेत ३९३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. विविध गटांतील विजेत्यांमध्ये किसनवीर महाविद्यालय, वाई; पर्यावरणशास्त्र विभाग; स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी; आप्पासाहेब बिरनाळे कॉलेज ऑफ फार्मसी, सांगली व भूगोल विभाग यांचा समावेश आहे. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. एस. जी. घाणे आदी उपस्थित होते. डॉ. आसावरी जाधव यांनी आभार मानले. डॉ. के. डी. सोनवणे, डॉ. एस. एम. गायकवाड, डॉ. पी. के. पवार, डॉ. ए. एस. जाधव यांनी स्पर्धा आयोजनासाठी परिश्रम घेतले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 OCT 2026
सकाळ



इचलकरंजी : शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत यश मिळवलेल्या विद्यार्थिनींसमवेत श्रीमती सोनल बोहरा, प्राचार्य डॉ. विजय माने आदी.

व्यंकटेश महाविद्यालय विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत

इचलकरंजी : व्यंकटेश महाविद्यालयाने शिवाजी विद्यापीठातील गुणवत्ता यादीत यश मिळवत परंपरा कायम ठेवली. एम. कॉम. विभागाची विद्यार्थिनी दीपाली मुरगुडे हिने गुणवत्ता यादीत प्रथम व अकाउंटन्सी विषयांमधूनही प्रथम क्रमांक प्राप्त केला. शिवाजी विद्यापीठामार्फत देण्यात येणाऱ्या रत्नाप्पा कुंभार वाणिज्य पारितोषिक, श्री. प्रभाकर पंत कराडकर पारितोषिक तसेच कै. भूपेश विनोद भाटे स्मृती पारितोषिकही प्राप्त केले. तसेच, समीक्षा परीट हिने चौथा क्रमांक, तर गौतमी पोवार हिने पाचवा क्रमांक मिळवला. यशस्वी विद्यार्थिनींचा सत्कार श्रीमती सोनल बोहरा, प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने यांच्या उपस्थितीत झाला. डॉ. बी. एन. कांबळे, डॉ. एस. एच. आंबवडे, डॉ. एस. आर. ठाकर, एस. बी. मलगान, प्रा. एस. टी. बिरंजे, व्ही. ए. गांधी आदी उपस्थित होते.

25 OCT 2026

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर विभागीय महिला क्रिकेट स्पर्धेत धडक कामगिरी : महावीर कॉलेजला मिळाले उपविजेतेपद

विवेकानंद महाविद्यालयाने प्रथमच पटकावले अजिंक्यपद

| त. भा. प्रतिनिधी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर विभाग महिला क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात विवेकानंद महाविद्यालयाने महावीर कॉलेजच्या १३ धावांनी पराभव करत विजेतेपद पटकावले. विवेकानंद महाविद्यालयाच्या इतिहास प्रथमच शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर विभाग महिला क्रिकेट स्पर्धेचे महाविद्यालयाने विजेतेपद मिळवले आहे. या विजेतेपदासाठी कर्णधार मिसबा सय्यद, संजना वाघमोडे व अनिषा बिकड यांनी केलेली उत्तम खेळी व महाविद्यालयाच्या संघाने दाखवलेले टिम वर्क महत्वपूर्ण ठरले आहे.

इचलकरंजीतील दताजीराव कदम आर्ट, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेजच्या वतीने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. याच कॉलेजच्या मैदानात स्पर्धा झाली. यामध्ये ६ महाविद्यालयीन संघांनी प्रतिनिधीत्व केले. स्पर्धेच्या पहिल्या उपांत्य सामन्यात विवेकानंद महाविद्यालयाने डॉ. डी. वाय. पाटील कॉलेजला २० धावांनी हरवून अंतिम फेरीत प्रवेश केला. तसेच दुसऱ्या उपांत्य सामन्यात महावीर कॉलेजने इचलकरंजीतील डीकेटीई कॉलेजवर विजय मिळवत अंतिम फेरीत उडी घेतली होती.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर विभाग महिला क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद मिळवलेल्या विवेकानंद महाविद्यालयाच्या संघाला चषक देऊन गौरवताना मान्यवर.

विवेकानंद महाविद्यालय व महावीर कॉलेज यांच्यात अंतिम सामना झाला. विवेकानंद महाविद्यालयाने ५ षटकात २ बाद ५६ धावा केल्या होत्या. यामध्ये अनिषा बिकडने १६ व कर्णधार मिसबा सय्यदने १४ धावांचे योगदान दिले. प्रत्युत्तरादाखल महावीर कॉलेजला मात्र ५ षटकात ५ बाद ४३ धावांच करता आल्या. त्यामुळे या संघाचा १३ धावांनी पराभव होऊन सामना विजेत्या विवेकानंद महाविद्यालयाच्या गळ्यात स्पर्धेच्या विजेतेपदाची माळ पडली. महाविद्यालयाला विजेतेपद मिळवून देण्यासाठी संजना वाघमोडे व अनिषा बिकड यांनी प्रत्येकी २ बळी घेतले. स्पर्धेचे विजेतेपद मिळाल्याने विवेकानंद महाविद्यालयाची आता सांगलीतील चिंतामणराव कॉलेज ऑफ कॉमर्सच्या मैदानात २६ व २७ ऑक्टोबर या कालावधीत होणाऱ्या शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय महिला क्रिकेट स्पर्धेसाठी निवड झाली आहे. खेळाडूंना श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, डॉ. सी. बी. पाटील, जिमखाना विभागप्रमुख डॉ. विकास जाधव, प्रशिक्षक प्रा. साद मुजावर यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

स्पर्धा विजेत्या विवेकानंद महाविद्यालयाचा संघ

मिसबा सैय्यद (कर्णधार), संजना वाघमोडे, प्रिती शेळके, अनिषा बिकड, प्रियांका नाजरे, स्वामिनी गावडे, दृष्टी पोबार, निसर्गा शिंदे, सिंधी परसपुरे, रिया दुमके, विद्या ढगे, पूर्वा लवांगरे, प्रिया गुरव.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 OCT 2026
जनपवार्ता

नाइट कॉलेजमध्ये 'बँकिंग क्षेत्रातील करिअरच्या संधीवर चर्चा

कोल्हापूर : ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर रोनित खराडे यांनी राष्ट्रीयकृत बँका, खासगी बँका, तसेच सहकारी बँकिंग क्षेत्रातील रोजगाराच्या विविध संधींबद्दल सविस्तर माहिती दिली. तसेच आयबीपीएस, एसबीआय व इतर बँकिंग स्पर्धा परीक्षांचे स्वरूप, अभ्यासक्रम, मुलाखतीची तयारी आणि आवश्यक व्यावहारिक कौशल्यांवर त्यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. उत्तम पाटील होते.कौन्सिल ऑफ एज्युकेशन संचलित, नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स, कोल्हापूर येथील वाणिज्य विभाग आणि करिअर समुपदेशन व प्लेसमेंट सेल यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी' बँकिंग क्षेत्रातील करिअरच्या संधी' या विषयावर विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. प्रास्ताविक कार्यशाळेचे संयोजक प्रा. डी एस. जाधव यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. तेजस गुरव यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 OCT 2026

तरुण भारत



इचलकरंजी : सामन्यातील एक क्षण.

नाईट कॉलेज, डांगे कॉलेजची विजयी सलामी

- शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय पुरुष खो—खो स्पर्धेला प्रारंभ

त. भा. प्रतिनिधी

इचलकरंजी : येथील जयहिंद मंडळाच्या क्रीडांगणावर शिवाजी विद्यापीठाच्या आंतरविभागीय पुरुष खो–खो स्पर्धेला प्रारंभ झाला. पहिल्याच दिवशी यजमान नाईट कॉलेज, इचलकरंजी आणि डांगे कॉलेज, हातकणंगले यांनी प्रतिस्पर्ध्यांवर मात करीत विजयी सलामी दिली.

स्पर्धेतील पहिल्या सामन्यात डांगे कॉलेजने एन. पी. पी. कॉलेज, बोरगावचा एक डाव सात गुणांनी पराभव केला. डांगे कॉलेजच्या खेळाडूंनी आक्रमक खेळ करीत पहिल्या डावात प्रतिस्पर्ध्यांचे १९ गडी बाद केले. बोरगाव संघाला पहिल्या डावात चार, तर दुसऱ्या डावात आठ गडी बाद करता आले.

दुसऱ्या सामन्यात यजमान नाईट कॉलेजने के. डब्ल्यू. सी., सांगलीवर एक डाव आणि एक गुणाने विजय मिळवला. नाईट कॉलेजच्या खेळाडूंनी पहिल्या डावात सांगलीचे १२ गडी बाद केले. इचलकरंजीच्या भक्कम बचावामुळे सांगली संघाला दोन्ही डावांत मिळून ११ गडी बाद करता आले.

अन्य सामन्यांत एस. जी. एम. कॉलेज, कराडने बळवंत कॉलेज, विटा, तर व्ही. सी. कॉलेज, कराडने घाळी कॉलेज, गडहिंग्लजचा पराभव करीत पुढील फेरीत प्रवेश केला. स्पर्धेचे उद्घाटन निलेश चंगेडिया, देशभक्त बाबासाहेब भा. खंजिरे शिक्षण संस्थेचे चेअरमन अरुण खंजिरे, उपाध्यक्ष बाळासाहेब मुरदंडे, सुहास गोरे, सदानंद कित्तुरे, राहुल खंजिरे आणि प्राचार्य डॉ. विरुपाक्ष खानाज यांच्या हस्ते झाले.

निवड चाचणीसाठी ४० खेळाडूंचा सहभाग

सांगली, सातारा आणि कोल्हापूर जिल्ह्यांतील १२ संघांसह वैयक्तिक निवड चाचणीसाठी ४० खेळाडू सहभागी झाले आहेत. या स्पर्धेतून पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ आणि महाराष्ट्र राज्य क्रीडा महोत्सवासाठी शिवाजी विद्यापीठाच्या खेळाडूंची निवड केली जाणार आहे. स्पर्धा रात्री उशिरापर्यंत प्रकाशझोतात सुरू होती.

25 OCT 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

नाईट कॉलेज, डांगे महाविद्यालयाची विजयी सलामी

शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय पुरुष खो-खो स्पर्धा

■ सकाळ वृत्तसेवा

इचलकरंजी, ता. २४ : येथील जयहिंद मंडळाच्या क्रीडांगणावर सुरू झालेल्या शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय पुरुष खो-खो स्पर्धेत यजमान नाईट कॉलेज, इचलकरंजी आणि डांगे महाविद्यालय, हातकणंगले यांनी प्रतिस्पर्ध्यांवर मात करीत विजयी सलामी दिली. एस.जी.एम. कॉलेज, कऱ्हाड आणि व्ही. सी. कॉलेज, कऱ्हाड यांनीही आपापले सामने जिंकून पुढील फेरीत प्रवेश केला.



इचलकरंजी : शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय पुरुष खो-खो स्पर्धेला जयहिंद क्रीडांगणावर प्रारंभ झाला. उद्घाटनप्रसंगी सहभागी संघ आणि प्रमुख मान्यवर.

सलामीच्या सामन्यात डांगे महाविद्यालयाने एन.पी.पी. कॉलेज, बोरगाव संघावर एक डाव, सात गुणांनी मात केली. डांगे कॉलेजच्या खेळाडूंनी आक्रमक खेळाचे प्रदर्शन करीत पहिल्या डावात प्रतिस्पर्धी संघाचे १९ खेळाडू बाद केले. याउलट बोरगाव संघाला पहिल्या डावात चार, तर दुसऱ्या डावात आठ खेळाडू बाद करता आले. त्यामुळे डांगे कॉलेजने एक डाव, सात गुणांनी विजय मिळवला.

दुसऱ्या सामन्यात यजमान नाईट कॉलेजने के. डब्ल्यू.सी. कॉलेज, सांगली संघाला एक डाव, एका गुणाने पराभूत केले. नाईट कॉलेजच्या खेळाडूंनी सुरुवातीपासूनच सामन्यावर पकड मिळवली. पहिल्या डावात सांगली संघाचे १२ खेळाडू बाद करीत नाईट कॉलेजने आघाडी घेतली. इचलकरंजीच्या खेळाडूंनी बचावातही भक्कम कामगिरी केल्याने सांगली संघाला दोन्ही डावांत मिळून ११ खेळाडूच बाद करता आले. अन्य सामन्यांत एस. जी. एम. कॉलेज, कऱ्हाडने बळवंत कॉलेज, विटा संघावर, तर व्ही. सी. कॉलेज, कऱ्हाडने घाळी कॉलेज, गडहिंग्लज संघावर मात केली. स्पर्धेतील सामने रात्री उशिरापर्यंत प्रकाशझोतात सुरू होते. नीलेश चंगेडिया, देशभक्त बाबासाहेब भा. खंजिरे शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अरुणराव खंजिरे, उपाध्यक्ष बाळासाहेब मुरदंडे, सुहास गोरे, सदानंद कित्तुरे, प्राचार्य डॉ. विरुपाक्ष खानाज यांच्या प्रमुख उपस्थितीत स्पर्धेचे उद्घाटन झाले.

सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यातील १२ संघ सहभागी

■ सांगली, सातारा आणि कोल्हापूर या तीन जिल्ह्यांतील विभागीय स्पर्धांमधून प्रथम चार क्रमांक मिळवलेले एकूण १२ संघ या स्पर्धेत सहभागी झाले आहेत. याशिवाय वैयक्तिक निवड चाचणीसाठी ४० खेळाडूंनी सहभाग नोंदवला आहे.

शिवाजी विद्यापीठाचा संघ आज ठरणार

■ गटातील साखळी सामने आज पूर्ण झाल्यानंतर रविवारी उपांत्यपूर्व, उपांत्य आणि अंतिम सामने रंगणार आहेत. या सामन्यांनंतर पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धा आणि महाराष्ट्र राज्य क्रीडा महोत्सवासाठी शिवाजी विद्यापीठाच्या पुरुष खो-खो संघाची निवड केली जाणार आहे.